# <u>उल्हासनगर महानगरपालिका</u>

आ.जा.क्र. उमपा/करवि यु.७ / ९८ /२०२५
दिनांक:30 /E /२०२५

विषय:- माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९, (१) अंतर्गत अपिलाचे सुनावणीसाठी उपस्थित राहणेबाबत.

संदर्भ:- श्री, अनिल बी. आनंदानी, यांनी दिनांक २७/१२/२०२४ रोजी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९, (१) अंतर्गत आक्षेप/हरकत अर्ज.

**<u>सादर</u>**

उल्हासनगर महानगरपालिका क्षेत्रात अस्तित्वात असलेल्या इमारती व जमिनीवर महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार मालमत्ता कर आकारणी करण्यात येते मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती श्रीम. रेखा आय बठीजा, अशी नोंद आहे. सदर नोंदणीबाबत श्री, अनिल बी. आनंदानी, यांनी माहिती अधिकार अधिनियम २००५ चे कलम १९, (१) अंतर्गत आक्षेप/हरकत दिनांक २७/१२/२०२४ रोजीच्या अर्जान्वये आक्षेप/हरकत अर्ज दाखल केला होता.

२) सदर आक्षेप/हरकती अर्जाच्या अनुषंगाने उल्हासनगर महानगरपालिका नोंदीनुसार वर्ष २०२२-२०२३ मध्ये नाव हस्तांतरण आदेश जा.क्र.उमपा/युनिट-७/४४०/२०२२ दिनांक ०४/०१/२०२३ या आदशान्वये मालमत्ता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती श्रीम. रेखा आय बठीजा, या नावाची नोंद खालील कागदपत्राच्या आधारे करण्यात आली आहे.

अ) कर भरणा ना देयक प्रमाणपत्र वर्ष २०२२-२०२३

ब) श्रीम. रेखा आय बठीजा, यांचे दिनांक २३/१२/२०२२ रोजीचे प्रतीज्ञापत्र.

क) श्री. अनिल ब्रिजलाल आनंदानी, (लिहून देणार) श्रीम. रेखा आय बठीजा, (लिहून घेणार) यांच्यातील दिनांक २१/०१/१९९८ रोजीचे नोटरी खरेदीखत

ड) दिनांक २३/१२/२२ रोजीच्या सिंधी डेली टाउन दर्शन या वर्तमान पत्रातील जाहिरात.

इ) श्री. व्ही. के. खंडारे, यांचे समक्ष करणेत आलेले सि. नं.१३० दिनांक २२/१२/२०२२ रोजीच्या हमी ताव पत्र यांच्या छायांकीत प्रती सादर केल्या आहेत.

उक्त नमुद हरकतीचे अनुषंगाने **प्रथम** सुनावणी दिनांक २७ /१२ /२०२४ रोजी सकाळी ३:३० वाजता कर निर्धारक व संकलक यांचे दालनात बैठक आयोजित करणेत आली होती. सदर सुनावणीस अर्जदार श्री. अनिल बी. आनंदानी उपस्थित होते. आणि गैरअर्जदार श्री./श्रीम. रेखा आय बठीजा, हे अनुउपस्थित होते.

**व्दितिय** सुनावणी दिनांक १७/०१/२०२५ रोजी सकाळ/दुपारी १२:१५ वाजता प्रथम अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक यांचे दालनात बैठक आयोजित करणेत आलेली सुनावणी प्रशासकीय कारनास्तव रदद करणेत आली होती.

**तृतिय** सुनावणी दिनांक ०४/ ०२ /२०२५ रोजी सकाळी/दुपारी वेळ १:४५ वाजता कार्यालयीन वेळेत कर निर्धारक व संकलक यांचे दालनात ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणी वेळी तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक यांना अर्जदार यांचे तक्रारीच्या अनुषंगाने संबंधित कर निरिक्षक यांनी स्थळ पाहणी करुन पंचनामा अहवाल घेवुन पुढील सुनावणीची तारीखेस सदर करावा.

उक्त ओशान्वये सदर मिळकतीची प्रत्यक्ष पाहणी केली असता सद्यस्थितीत जागेवर श्री अनिल बी. आनंदानी शॉप नं २, मुक्तीधाम अपार्टमेंट जवळ, नेताजी देवसमाज रोड, उल्हासनगर-४ या ठिकाणी दुकान असुन ते स्वता: चालवित असल्याचे निदर्शनास आले आहे. सदर ठिकाणाचे प्रत्यक्ष स्थळ पाहणी करणेत आलेले छायाचित्रांची छायांकित प्रत सोबत जोडत आहे.

सदर अहवाल/पंचनामा अन्वये पुढील सुनावणी दिनांक २४/०६/२०२५ रोजी सकाळी/दुपारी १२:३० वाजता प्रथम अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक यांचे दालनात बैठक आयोजित करणेत आलेली होती.

सबब सुनावणीच्या दिवशी विहीत वेळी उचित कारणास्तव अर्जदार/गैरअर्जदार उनुउपस्थित राहील्यास आपण दाखल केलेल्या हरकत/अपिल अर्जावर आपले काही म्हणने नाही. असे गृहीत धरून एक तर्फी निर्णय घेण्यात येईल याची नोंद घ्यावी. असे सुणावणी नोटीसव्दारे कळविण्यात आले होते.

नैसर्गीक न्यायतत्वाचा विचार करता, तसेच आपले मत सविसतर मांडण्याकरीता **अंतिम चतुर्थ** सुनावणी दिनांक २४/०६/२०२५ रोजी सकाळी/दुपारी १२:३० वाजता प्रथम अपिलीय अधिकारी तथा कर निर्धारक व संकलक यांचे दालनात बैठक आयोजित करणेत आलेली होती. सदर सनावणीस अर्जदार श्री अनिल बी. आनंदानी, हे उपस्थित होते. तसेच गैरअर्जदार श्रीम. रेखा आय बठीजा, उनुपस्थित होते.

सबब दिनांक २४/०६/२०२५ रोजीच्या अंतिम सुनावणीच्या अंतिम निर्णयास गैरअर्जदार श्रीम. रेखा आय बठीजा, सतत सुनावणीस गैरहजर असल्यामुळे त्यांच्याकडे आपल्या मालकीहक्कासंदर्भात मिळकतीचे मुळ व ठोस पुरावे नसल्यामुळे

सदर नमुद बाबी विचारात घेता मालमत्ता क्रमांक ५०डीआय०१३६२२७०० करीता कर वसुलीच्या प्रयोजनार्थ कर देण्यास प्रथमत: पात्र जबाबदार व्यक्ती म्हणुन श्री, अनिल बी. आनंदानी, अशी नोंद कायम ठेवणे उचित वाटते.

पुढील आदेशार्थ सविनय सादर.

(साहेबराव सावळे)
लिपीक

(सचिन निकम)
कर निरिक्षक यु-७

(नितेश रंगारी)
उप कर निर्धारक व संकलक

(मयुरी कदम)
कर निर्धारक व संकलक
उल्हासनगर महानगरपालिका